# एक्सेल गॅस अँड इक्विपमेंट्सला मिळाले इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्यूकेशन अँड रिसर्च, पुणे कडून आणखी एक कंत्राट

पुणे : एक्सेल गॅस अँड इक्विपमेंट्सला इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्यूकेशन अँड रिसर्च, पुणे कडून आणखी एक कंत्राट मिळाले आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्यूकेशन अँड रिसर्च पुणे ही संशोधनातील प्रशिक्षण संस्था आहे. एक्सेल गॅस अँड इक्विपमेंट्स प्रा.लि. ही कंपनी महापे येथे असून गेले १३ वर्षांपासून गॅस हँडलिंग सिस्टिमच्या टर्नकी इन्स्टॉलेशन मध्ये आघाडीची कंपनी आहे. कंपनीचे कार्यक्षेत्र केवळ भारतातच नाही तर मध्य-पूर्वेतही ते विस्तारले आहे.

कंत्राटाविषयी अधिक बोलताना एक्सेल गॅस अँड इक्विपमेंट्सचे कार्यकारी संचालक नितीन गोडसे म्हणाले की, कंत्राटामध्ये ग्राहकाच्या गरजा समजून घेणे, त्याची रचना, सामुग्री मिळवणे, इन्स्टॉलेशन आणि आयआयएसईआर पुणे येथील रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्राच्या इमारतीत गॅस हँडलिंग सिस्टिम बसवणे आहे. तसेच प्रत्येक प्रयोगशाळेत जलवाहिन्यांचे अंतर्गत पाइपजोडण्या करणे आहे. आधी या प्रकल्पाची पूर्तता करण्यासाठी १२० दिवसांची मर्यादा होती परंतु, प्रकल्प वाढल्याने त्याची मुदत ४५० दिवस इतकी करण्यात आली. ऑटोमेशन पध्दत इंडियन-एक्सलोक मेक चेंजओव्हरमध्ये एकरूप करण्यात आली आहे. संपूर्ण ट्यूबिंग ब्रोएन मेक व्हॉल्व्हसची रचना आणि इन्स्टॉलेशन केले आहे. संपूर्ण इन्स्टॉलेशन कॉम्प्रेशन फिटींगच्या साहाय्याने केले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर, एक्सेल आयआयएसईआर-पुणेसाठी पुढील २ वर्षांसाठी एएमसी करणार असून त्यासाठी पूर्णवेळ निवासी अभियांत्रिकाची नियुक्ती करण्यात येणार आहे.